# जाहीर सूचना

एम एम आर डी ए
MMRDA

१. मेट्रो मार्गिका-६ (स्वामीसमर्थनगर-जोगेश्वरी-विक्रोळी) या उन्नत मार्गिकेस शासन निर्णय क्र.एमआरडी-३३१६ /प्र.क्र.१४०/नवि-७, दि.२१/१२/२०१७ अन्वये महाराष्ट्र शासनाने मान्यता प्राप्त दिली आहे.

२. मेट्रो मार्गिका-६ या उन्नत मार्गिकेमुळे बाधित होणा-या बांधकामांचे बांधकामधारकांचे पायाभूत सामाजिक, आर्थिक सर्व्हेक्षण करण्यात आले असून, सदरचा सर्व्हेक्षण अहवाल सह महानगर आयुक्त, पहिला माळा, एम.एम.आर.डी.ए., नविन इमारत, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१ यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

३. मेट्रो मार्गिका-६ या उन्नत मार्गिकेमुळे बाधित होणा-या किर्ती कंम्पाऊड येथील प्रकल्पबाधितांच्या पात्र/अपात्रतेबाबतची प्रारुप यादी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सूचना फलकावर तसेच https://mmrda.maharashtra.gov.in/its#या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. या यादीच्या / निर्णयाच्या अनुषंगाने कोणाची काही हरकत असल्यास त्याबाबतचे अर्ज एम.एम.आर.डी.ए., नविन इमारतीच्या तळ मजल्यावरील प्रतिक्षाकक्षामध्ये दि. २२.०७.२०२० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० या वेळेत स्वीकारण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

४. तसेच याद्वारे असेही सूचीत करण्यात येते की, उक्त यादीमधील बांधकामधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA), बृहन्मुंबई महानगरपालिका (MCGM) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) इ. मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना/प्रकल्पातंर्गत लाभ मिळाला असल्यास त्याबाबत वरील परिच्छेदात नमूद पत्त्यावर व नमूद कालावधीमध्ये निदर्शनास आणून द्यावे अन्यथा अशा बांधकामधारकांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक - ०७/०७/२०२०
ठिकाण - मुंबई

(शिल्पा कामथे)
तहसिलदार
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
दू +९१ २२ २६५९ १२३४ ईपीएबीएक्स +९१ २२ २६५९ ०००१ / ४००० फॅ +९१ २२ २६५९ १११२ / १२६४
https://mmrda.maharashtra.gov.in